## प्रेसनोट

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अकोला

दिनांक:— १३/०३/२०२६

| | | |
|---|---|---|
| १ | युनिट चे नाव | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला घटक |
| २ | आरोपीचे नाव, हुद्दा व कार्यालयाचा पत्ता. | आरोपी लोकसेवक १) दिपक गणपतराव कानडे वय ५६ वर्ष, पद सहायक पोलीस उपनिरीक्षक १५०९ वर्ग —३, नेम. पोलीस ठाणे मुर्तीजापूर ग्रामिण जि. अकोला रा. स्वामी समर्थ नगर, कारंजा ता. कारंजा जि. वाशिम, २) ज्ञानेश्वर विठ्ठलराव रडके वय ३८ वर्ष, पद पोलीस हवालदार १९२० वर्ग ३ पो.स्टे. मुर्तीजापूर ग्रामिण रा. जामठी बु. ता. मुर्तीजापूर जि. अकोला ह.मु. बध्व सोनोने सर यांचे घरी आर्शिर्वाद नगर, मुर्तीजापूर जि. अकोला. |
| ३ | घटना तारीख वेळ | दिनांक ११.०२.२०२६ चे १५.०० ते दि. ११.०३.२०२६ चे २३.३० वा. दरम्यान |
| ४ | मागणी केलेली लाच रक्कम | ३०००/— रू |
| ५ | तडजोड अंती मागणी लाच रक्कम | २०००/— रू. |
| ६ | घटनास्थळ | कारंजा रोड वरील गणेश मेडीकल जवळील पुणेरी कॅन्टीन जवळ तसेच पोलीस ठाणे मुर्तीजापूर जि. अकोला |

थोडक्यात हकिकत :—

यातील तक्रारदार यांनी ला.प्र.वि. अकोला येथे दि. ११.०२.२०२६ तक्रार नोंदविली की, आलोसे श्री. दिपक कानडे सहायक पोलीस उपनिरीक्षक बिट जमादार अनभोरा, पोलीस स्टेशन मुर्तीजापूर ग्रामिण व त्यांचे रायटर श्री. रडके, पोलीस अंमलदार हे भेटले त्यावेळी त्यांनी तक्रारदारास म्हटले की, ''तु तुझे शेतामध्ये दारूचा धंदा करीत असून आम्ही तुझेवर दारूचा विक्रीची कार्यवाही करीन तुझा दारूच्या धंदयावर कार्यवाही करायची नसेल तर तु आम्हाला दर महिन्याला ३०००/— रूपये देत जा'' त्यावर तक्रारदार यांनी नाईलास्तव ठिक आहे असे बोलून तेथून निघून आले.

सदर तक्रारीवरुन दिनांक ११.०२.२०२६ रोजी कारंजा रोड वरील गणेश मेडीकल जवळील पुणेरी कॅन्टीन जवळ तसेच पोलीस ठाणे मुर्तीजापूर जि. अकोला येथे वरील आलोसे क्र. १ यांची सदर लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान तक्रारदार यांना स्वत:च्या आर्थिक फायदयाकरीता शासकीय पंचासमक्ष तडतोड अंती रू. २०००/— ची मागणी करून लाचरक्कम मिळविण्याचा प्रयत्न केला. तसेच वरील नमूद आलोसे क्र. २ यांची दिनांक १४.०२.२०२६ रोजी पोलीस स्टेशन मुर्तीजापूर येथे तक्रारदार यांना स्वत:च्या आर्थिक फायदयाकरीता शासकीय पंचासमक्ष तडतोड अंती रू. २०००/— ची मागणी केली. त्यावरून दिनांक ११.०३.२०२६ रोजी सापळा कार्यवाही आजमावली असता वर नमूद दोन्ही आरोपी लोकसेवक यांना तक्रारदारावर संशय आल्याने त्यांनी तक्रारदाराकडून लाच रक्कम स्विकारण्यास नकार दिला. वरील दोन्ही आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदाराकडुन तडजोडअंती रू. २०००/— लाचरक्कम मागणी केल्याचे निषन्न झाल्याने वर नमूद दोन्ही आलोसे यांना ताब्यात घेवून पो.ठाणे मर्तीजापूर शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कार्यवाही मा. श्री. बापु बांगर, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती (९०११३२३४२६), मा. श्री. सचिंद्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती (९७६४२१०४८५), मा. श्री. मिलींदकुमार अ. बहाकर, पोलीस उपअधिक्षक, अकोला (९१५८८२२६७६)यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. पोलीस निरीक्षक अतुल इंगोले, पोलीस निरीक्षक प्रविण वेरूळकर, लाप्रवि. अकोला यांचे सोबत, पोलीस हवालदार अमोल भांड, दिगंबर जाधव अविनाश पाचपोर, पो.अ. असलम शेख, गोपाल किरडे, संदिप ताले, नितीन पाटील चालक पोहवा सलीम खान, सर्व ला.प्र.वि. अकोला यांनी पार पाडली.

तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी/लोकसेवक अथवा त्यांच्यावतीने कोणत्याही खाजगी इसमाने त्यांचे कोणतही शासकीय काम करून देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास तात्काळ अॅन्टी करप्शन ब्युरो, अकोला येथील खालील क्रमांवर संपर्क साधावा.

ऑफिस फोन नं. ०७२४—२४१५३७०, टोल फ्रि क्रमांक— १०६४
मोबाईल क्र. ९४०३८०१०६४

(अतुल गुणवंतराव इंगोले)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अकोला